माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ संचलित,
महेश बालभवन आयोजित

# * आंतरशालेय समूह नृत्य स्पर्धा *

# तापडिया करंडक २०२६

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ

वर्ष १० वे



१०१ व्या स्मृतिप्रीत्यर्थ
आदरणीय स्व. भगीरथजी तापडिया

**शनिवार १७ जानेवारी २०२६, (मोठा गट) स. ९ ते दु. १२ व (लहान गट) दुपारी १२ ते ३**




## * गट *

पहिला गट - १ ली ते ४ थी
दुसरा गट - ५ वी ते १० वी

## *भव्य पारितोषिके (प्रत्येक गटास)*

**प्रथम क्रमांक २१०००/- व तापडिया करंडक**

द्वितीय क्रमांक १५०००/- तृतीय क्रमांक ११०००/-
चतुर्थ क्रमांक ५०००/- उत्तेजनार्थ ३०००/-

**प्रायोजक - सेफ पॅक इंडस्ट्रीज लिमिटेड पुणे.**

## *स्थळ*

**यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कोथरूड**

## *संपर्क*

| | | |
|---|---|---|
| सौ वंदना मुंदडा<br>महेश बालभवन अध्यक्षा | सौ अंजली तापडिया<br>प्रकल्प प्रमुख | सौ प्रिती लाठी<br>महेश बालभवन सचिव |

सौ सुरेखा करवा-९८९०१३५३६२
महेश बालभवन संचालिका

सौ संगीता पिंपळीकर-९८८१७९३२०७
महेश बालभवन उपसंचालिका

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ संचलित,

महेश बालभवन आयोजित

# * आंतरशालेय समूह नृत्य स्पर्धा *

# तापडिया करंडक २०२६

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ

वर्ष १० वे

*** स्पर्धेसाठी प्रवेश फी ३००/- रू फक्त ***

*** नाव नोंदणी अंतिम तारीख १२ जानेवारी २०२६ ***

## *स्पर्धेचे नियम*

- ✓ गाणे व वेशभूषा संस्कृतीला शोभेल अशी असावी. पाश्चात्य नृत्यप्रकारांना परवानगी नाही.
- ✓ समूह नृत्य सादरीकरणाचा वेळ ५ ते ७ मिनिटे असावा.
- ✓ कलाकारांची संख्या किमान ६ व जास्तीत जास्त २० असावी.
- ✓ प्रत्येक कलाकाराला प्रशस्तिपत्र देण्यात येईल.
- ✓ परीक्षकांचे निर्णय अंतिम असतील व सर्वांना बंधनकारक असतील.
- ✓ कलाकारांनी स्पर्धेच्या दिवशी सकाळी स्पर्धेच्या ठिकाणी उपस्थित राहावे.
- ✓ एका गटात एका शाळेचे एकच नृत्य घेतले जाईल.
- ✓ फॉर्म व गाण्याचा पेनड्राईव्ह जमा करण्याची अंतिम तारीख १२ जानेवारी २०२६ आहे.
- ✓ एका नृत्याचे पुन:पुन्हा सादरीकरण टाळण्यासाठी गाण्याचे बोल अगोदर कळवावेत.
- ✓ प्रेक्षकांसाठी प्रवेश निशुल्क आहे.

ऑनलाईन प्रवेश अर्ज

प्रायोजक:

safepack™ SOLUTIONS


महेश बालभवन आयोजित


महेश बालभवन आयोजित


safepack
SOLUTIONS


आंतरशालेय समूह नृत्य
तापडिया करंडक







लोकमत

# नृत्याविष्कारातून अवतरल्या भारतीय लोककला

## तापडिया करंडक : एंजल हायस्कूलने पटकाविला विजेतेपदाचा मान

लोकमत न्यूज नेटवर्क



महेश बालभवनतर्फे तापडिया करंडक आंतरशालेय समूहनृत्य स्पर्धेत नृत्य सादर करताना विद्यार्थी.

पुणे : 'विठ्ठल विठ्ठल'च्या गजरात रंगलेला पालखी सोहळा... 'शिवाजी महाराज की जय'च्या जयघोषात सादर केलेला शिवराज्याभिषेक दिन... आदिवासी नृत्य, काश्मिरी लोकनृत्य, दक्षिणी भरतनाट्यम् आणि हरियाणवी नृत्यापासून महाराष्ट्राची लोकधारा असे भारताच्या प्रादेशिक संस्कृतीचे आणि परंपरेचे दर्शन घडविणारा अप्रतिम नृत्याविष्कार स्पर्धकांनी सादर केला. एंजल हायस्कूलने यंदाचा तापडिया करंडक पटकाविला.

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ संचलित महेश बालभवनतर्फे तापडिया करंडक आंतरशालेय समूह नृत्य स्पर्धेचे आयोजन कोथरुड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात करण्यात आले होते. स्पर्धेच्या सुरुवातीला वंदे मातरम्, जयोस्तुते..जयोस्तुते, सामाजिक संदेश देणारे नृत्य स्पर्धकांनी सादर केले. याबरोबरच कोळी नृत्य, देवीचा गोंधळ, डोंबाऱ्याच्या आयुष्याची गाथा सांगणारे नाचतो डोंबारी हे नृत्यदेखील सादर केले. डोंबाऱ्यांचे खेळदेखील सादर करुन स्पर्धकांनी उपस्थितांना थक्क केले. प्राथमिक आणि माध्यमिक अशा दोन गटांमध्ये ही स्पर्धा झाली.

या वेळी सेफपॅक इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक राजेंद्र तापडिया, संस्थेचे अध्यक्ष अतुल लाहोटी, कार्याध्यक्ष रमेश धूत, प्रकल्पप्रमुख अंजली तापडिया, महेश बालभवनच्या अध्यक्षा संगीता लाहोटी, गणेश मुंदडा, सुरेखा करवा उपस्थित होते. राकेश राठी आणि अनुराधा गांधी यांनी परीक्षण केले. स्पर्धेचे यंदा ९ वे वर्ष होते.

संगीता पिंपळीकर यांनी सूत्रसंचालन केले.

Hello Pune
Page No. 2 Sep 12, 2017
Powered by: erelego.com

---

**आंतरराशालेय समुह नृत्य स्पर्धा** : मनपा शाळा क्र. ८९ विजेते

# उत्साहात रंगला तापडिया करंडक

पुणे : जिल्हास्तरीय आंतरशालेय समूह नृत्य स्पर्धा 'तापडिया करंडक' प्राथमिक गटात म. न. पा. शाळा क्र. ८९ बी (कोथरूड) व माध्यमिक गटात ज्ञानगंगा इंग्लिश मिडीयम स्कूल (सिंहगड रोड) यांनी पटकाविला आहे.

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ संचलित महेश बालभवन आयोजित या स्पर्धेत २६ शाळा सहभागी झाल्या होत्या. अंकूर विद्यामंदिर व साई सेवा शाळा या विशेष मुलांच्या शाळांचा सहभाग या स्पर्धेचे विशेष आकर्षण ठरले. काश्मीरी लोकनृत्यापासून दाक्षिणी भरतनाट्यमपर्यंत भारताच्या संस्कृतीचे व परंपरेचे दर्शन घडविणारे अप्रतिम नृत्याविष्कार सादर झाले. आयोजनाचे हे ८ वे वर्ष होते. दोन गटांमध्ये ६ करंडक व रोख रक्कम तसेच विशेष मुलांच्या शाळांनाही सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. तसेच प्रत्येक सहभागी कलाकाराला प्रशस्तिपत्रक देण्यात आले. (प्रतिनिधी)

- प्राथमिक गटात परांजपे मराठी प्राथमिक विद्यालय (लॉ कॉलेज रोड) (द्वितीय), एंजल प्रायमरी स्कूल (उरळी कांचन) (तृतीय), एस. एस. पी. एम. प्रायमरी डे स्कूल, शिवाजीनगर (चतुर्थ), सह्याद्री इंटरनॅशनल स्कूल पाषाण (पाचवा) हे विजेते ठरले. तर माध्यमिक गटात एंजल मिकी मिनी स्कूल (हडपसर)(द्वितीय), अभिनव विद्यालय हास्कूल मराठी माध्यिम (तृतीय), महेश विद्यालय मराठी माध्यम (चतुर्थ), म. ए. सो. पेरूगेट भावे हायस्कूल (पाचवा) हे विजेते ठरले.
- संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक राजेंद्र तापडीया, संस्थेचे कार्याध्यक्ष अतुल लाहोटी, राजेंद्र मंत्री, महेश बालभवनचे अध्यक्ष संतोष राठी, सचिव संगीता लाहोटी, प्रकल्प प्रमुख अंजली तापडिया, संचालिका सुरेखा करवा आदी उपस्थित होते. अनुराधा मालपाणी व जतिन पांडे यांनी परीक्षण केले. संगीता पिंपळीकर यांनी सूत्रसंचालन केले.



विजेते : म. न. पा. शाळा क्र. ८९ बी (कोथरूड) या प्राथमिक गटातील विजेता संघाला पारितोषिक देताना राजेंद्र तापडिया व महेश बालभवनचे पदाधिकारी.

---

THE TIMES GROUP
e-paper



तापडिया करंडक विजेत्या एंजल हायस्कूलमधील विद्यार्थी.

Sep 15 2017 : MaharashtraTimes (Pune)

# एंजल स्कूलला तापडिया करंडक

पुणे : माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ संचलित महेश बालभवनतर्फे आयोजित तापडिया करंडक आंतरशालेय समूहनृत्य स्पर्धेत यंदाचा तापडिया करंडकर एंजल हायस्कूलने पटकाविला. हा कार्यक्रम कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे पार पडला. या वेळी सेफपॅक इंडस्ट्रीजचे कार्यकारी संचालक राजेंद्र तापडिया, संस्थेचे अध्यक्ष अतुल लाहोटी उपस्थित होते. राकेश राठी आणि अनुराधा गांधी यांनी परीक्षण केले. स्पर्धेचे यंदा नववे वर्ष होते.

**निकाल :** इयत्त पहिली ते चौथी : द्वितीय क्रमांक विभागून : एंजल स्कूल (उरळी कांचन) आणि श्रीमती रत्नप्रभादेवी माहिते पाटील प्राथमिक शाळा, तृतीय क्रमांक विभागून : भावे प्राथमिक शाळा, परांजपे प्राथमिक विद्यालय, उत्तेजनार्थ : महेश विद्यालय मराठी माध्यम, सरहद स्कूल गुजर निंबाळकर वाडी आणि एंजल स्कूल (लोणी काळभोर)

इयत्ता पाचवी ते दहावी : द्वितीय क्रमांक विभागून : एमआयटी संत ज्ञानेश्वर माध्यमिक विद्यालय, ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूल, तृतीय क्रमांक विभागून : महेश विद्यालय मराठी माध्यम, आर्यन वर्ल्ड स्कूल, उत्तेजनार्थ : सिटी प्राइड स्कूल (निगडी), श्री सद्गुरू बाबामहाराज सहस्त्रबुद्धे विद्या मंदिर, महेश विद्यालय इंग्रजी माध्यम, अरानाझ रोझरी स्कूल (वारजे).

---



यशवंतराव चव्हाण नाट्यगृह : माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाच्या महेश बाल भवनच्या वतीने शनिवारी आयोजित केलेल्या आंतरशालेय समूहनृत्य स्पर्धेत नृत्य सादर करताना.

# तापडिया करंडक 'सेंट व्हिंसेंट' शाळेकडे

## आंतरशालेय समूहनृत्य स्पर्धेत प्रथम



यशवंतराव चव्हाण नाट्यगृह : माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळाच्या महेश बाल भवनने शनिवारी आयोजित केलेल्या आंतरशालेय समूहनृत्य स्पर्धेत सेंट व्हिंसेंट मुलांच्या शाळेच्या संघाने 'तापडिया करंडक' जिंकला.